वाचा :- १) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र.स्थाविका-२००७/प्र.क्र.१७०/का-१४८२,
२) मा.आ.श्री.अमित विलासराव देशमुख, विधानसभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ यांचे दिनांक ४.१०.२०११ चे शिफारस पत्र..

---

जा.क्र.२०११-१२/नियो/आस्थाविका/सांस-१/प्र.मा./२००७
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
दिनांक :-१६/१२/२०११

**//प्रशासकीय मंजूरी आदेश//**

उपरोक्त नमुद केलेल्या शासन निर्णयाद्धारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी जिल्हाधिकारी, लातूर आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमातर्गत **सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात मा.आ.श्री.अमित विलासराव देशमुख, विधान सभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ** यांनी उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये मंजुरीस्तव प्रस्तावीत केलेल्या **खालील (०८) आठ कामास सर्वसाधारण योजनेअंतर्गत** पुढील अटी व शर्तीवर प्रशासकीय मंजूरी देत आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत मंजूर करण्यांत येणारी कामे खाली दर्शविलेल्या संबंधित कार्यान्वयीन यंत्रणाकडे सोपविण्यांत येत आहे.

| प्र.मा. आदेश क्रमांक | मंजूर कामाचे नांव | तांत्रिक मान्यता दिनांक व क्रमांक | कार्यान्वयीन यंत्रणा | प्र.मा.रक्कम (रु.लाखात) | परिरक्षण करणा-या यंत्रणेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | २ | ४ | ५ | ६ |
| **१** | मौ. १२ नं. पाटी ता.जि.लातूर येथिल अंतर्गत रस्ता व नाली बांधणे (१८०.०० मीटर) ( लातूर बार्शी रोड पासून १८० मिटर देवी मंदिराकडे) | १८.१०.२०११ (१२४) अंतर्गत रस्ता | का.अ. सा.बां.वि. लातूर | **१०.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, १२ नं. पाटी ता.जि.लातूर |
| **२** | मौ.खंडापूर ता.जि.लातूर येथिल अंतर्गत रस्ता व नाली बांधणे (३३५.०० मीटर) | १८.१०.२०११ (१२५) अंतर्गत रस्ता | का.अ. सा.बां.वि. लातूर | **१०.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, खंडापूर ता.जि.लातूर |
| **३** | मौ. बाभळगांव (वैशालीनगर मारुती मंदिर), येथील सामाजिक सभागृह बांधणे (ग्रा.प.जागा मालकी नमुना ८-अ मधिल मिळकत नंबर १७९८/२ मध्ये) | १८.१०.२०११ (११८) येथील सामाजिक सभागृह बांधणे | का.अ. सा.बां.वि. लातूर | **५.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, बाभळगांव ता.जि.लातूर |
| **४** | मौ.कव्हा ता.जि.लातूर येथिल व्यायाम शाळा बांधकाम करणे. (ग्रा.प.जागा मालकी नमुना ८-अ मधिल मिळकत नंबर ७७२ मध्ये) | २५.११.२०११ (१५९) व्यायाम शाळा बांधकाम करणे. | का.अ. सा.बां.वि. लातूर | **१०.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, कव्हा ता.जि.लातूर |
| **५** | मौ. खोपेगांव ता. लातूर येथील अंतर्गत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे व नाली बांधणे | ०५.११.२०११ (१४२) अंतर्गत रस्ता | का.अ. सा.बां.वि. लातूर | **१०.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, खोपेगांव ता.जि.लातूर |
| **६** | मौ. कातपूर ता. लातूर येथील अंतर्गत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे व नाली बांधणे | ०५.११.२०११ (१४३) अंतर्गत रस्ता | का.अ. सा.बां.वि. लातूर | **१०.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, कातपूर ता.जि.लातूर |
| ७ | मौ. हरंगूळ (खु) ता. लातूर येथील अंतर्गत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे व नाली बांधणे | २४.१०.२०११ (१२७) अंतर्गत रस्ता | का.अ. सा.बां.वि. लातूर | **१०.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, हरंगूळ (खु) ता.जि.लातूर |
| **८** | मौ. साई रोड, चॉंद नगर (आर्वि )येथील नविन रस्ता करणे व नाली बांधणे | २४.१०.२०११ (१२८) अंतर्गत रस्ता | का.अ. सा.बां.वि. लातूर | **१०.००** | ग्रामसेवक, ग्रा.प.कार्यालय, आर्वि ता.जि.लातूर |
| | **एकूण** | | | **७५.००** | |

**एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम रु. ७५.०० लक्ष (रुपये पंच्याहत्तर लक्ष फक्त)**

या आदेशान्वये एकूण रक्कम रु. ७५.०० लक्ष (रुपये पंच्याहत्तरलक्ष फक्त) रकमेच्या आठ कामास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे.

अटी व शर्ती

१) ज्या कामास या आदेशाद्वारे प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे, त्या कामाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी हे काम कोणत्याही पाटबांधारे /जलविघुत/पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही. किंवा अशा प्रकल्पामुळे या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची पुन्हा खात्री करून घेतली पाहिजे.

२) सदरची कामे या विशेष कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कोणत्याही योजनांतर्गत योजना/कार्यक्रम अथवा इतर योजनेत्तर कामात समाविष्ट नाहीत याची खात्री घेऊनच काम सुरु करावे.

३) सदरच्या कामांना सक्षम अधिका-यांने तांत्रिक मान्यता दिली आहे याची खात्री करून घ्यावी. जिल्हास्तरीय अधिका-यांनी कमीत कमी एका वेळेस काम चालू असतांना व काम भौतीक दृष्टया पूर्ण झाल्यावर एका वेळेस कामाचे मुल्यमापन करण्यासाठी कामाच्या ठिकाणी जाणे गरजेचे आहे. तसेच कामाची गुणवत्ता राखण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांची आहे

४) या कार्यक्रमातील कामाचा वापर सार्वजनिक स्वरुपाचा असल्यामुळे शासकीय अथवा स्वायत्व संस्थेची जागा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी जर खाजगी जागा असल्यास लागणा-या जागेचे दानपत्र रजिष्टर करून घेवूनच सुरुवात करावी.

५) शासना कडून योजनातर्गत घ्यावयाच्या कामास नियोजन विभाग /सार्वजनिक बांधकाम विभाग /ग्राम विकास विभाग यांनी विहित केलेले निकष पाळावयाचे असून शासनाच्या मापदंडानुसार खर्च करावयाचे असून रस्त्याच्या कामामध्ये रस्त्याची मजबुती करण्यास या आदेशान्वये प्रशासकीय मंजूर दिली असल्यास महाराष्ट्र नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.स्थाविका-१०९७/प्र.क्र.३१२/का -१४४५ दि. १ जून, १९९८ अन्वये पूर्तता करुनच कामे हाती घ्यावी

६) प्रशासकीय मंजूरीच्या रक्कमेपेक्षा अधिक खर्च करण्यांत येवू नये.

७) शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार सदरची कामे पूर्ण होताच कामाच्या दर्शनिभागावर आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत सन २०१०-२०११ मध्ये घेण्यांत आलेले काम व खर्चाची रक्कम इत्यादी माहितीचा फलक लावावा.

८) हे काम सुरु करण्यापूर्वी संबंधित संस्थेचे/अभिकरणाचे नाहकरत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे व तसेच देखभाल व दुरुस्तीचे हामीपत्र संबंधित संस्थेकडून घेवून या कार्यालयास पाठवावे या बाबत वैयक्तीक जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील.

९) या कामाचे निरिक्षण व तपासणी जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिका-याकडून अथवा महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या अधिका-याकडून होवू शकेल.

१०) या कार्यक्रमाखालील येणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यांत यावा व खर्चाचा मासीक प्रगती अहवाल महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या ५ तारखे पर्यंत या कार्यालयास पाठवावा. तसेच रोजगार हमी योजना करिता घालून दिलेल्या लेखा पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.

११) नगर पालिका क्षेत्रातील कामे जर नगर पालीकेकडून कार्यान्वीत होत असतील तर त्या कामावर नगर रचनाकार यांनी निरिक्षण करावे व कामात आढळून आलेल्या त्रुटीची अंदाजपत्रकानुसार पूर्तता करून घ्यावी.

१२) सदरची कामे एक वर्षात पूर्ण करणे अपेक्षीत आहे. कामे पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचे दाखले/देखभाल व दुरुस्ती/काम हस्तातंरण केल्याचा दाखला व नोंदवही भरून दोन प्रतीत तसेच मंजूर काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा फोटो या कार्यालयास सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील.

१३) या कार्यक्रमात मतदारसंघनिहाय निधी उपलब्ध होत असल्यामुळे निधीची मागणी मतदारसंघनिहाय व कामनिहाय करावी.

१४) या कार्यक्रमावर होणारा खर्च सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षात खालील लेखा शिर्षाखाली होणा-या तरतूदीतून भागविण्यांत यावा व त्याच लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

(कृ.मागे पहा...)

नियोजन विभाग (मागणी क्र. ओ-९)
प्रधान लेखाशिर्ष - ४५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
१०२- सामुहिक विकास,पंचवार्षीक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना (१)
बहुउद्देशीय कार्यक्रम,(००)(०१) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (संकेतांक - ४५१५००१२)

**प्रति :- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव.**

**जिल्हाधिकारी, लातूर.**

**प्रत :- माहितीस्तव.**

१) मा.आ.श्री.अमित विलासराव देशमुख, विधान सभा सदस्य, लातूर (शहर) मतदारसंघ, मु.पो.बाभळगांव ता.जि.लातूर
यांना माहितीस्तव सादर.
२) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना माहितीस्तव.
३) निवड नस्ती.

**जिल्हाधिकारी, लातूर.**